नि.फौ.ख.क्र. ९८/२०२३
शासन विरुध्द सचिन
नि.क्र. ३०

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.५**

मी देवाची शपथ खरे सांगते की,
माझे नाव – आनंद मच्छींद्रनाथ भोसले
वय – ४३ वर्षे, कामधंदा - पोलीस हवालदार, ब. न. १७३४
नेमणुक– शाहुपुरी पोलीस स्टेशन

**सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती सुळ**

दिनांक ०८.१.२०२३ रोजी मी भुईंज पोलीस स्टेशनला पोलीस हवालदार या पदावर कार्यरत होतो. त्यावेळी माझे सहकारी पोलीस हवालदार श्री देशमुख ब.नं.५७५ यांनी प्रस्तुत अपराध क्र.५/२३ चे तपास काम पुर्ण करुन दोषारोपपत्र दाखल करण्याकामी मला सांगितले होते. ते ह्दय रोगाने आजारी असल्याने प्रस्तुत गुन्हयातील दोपारोपपत्र मी न्यायालयात दिनांक ३०.०३.२०२३ रोजी दाखल केले. या व्यतिरिक्त मी कोणतीही भुमिका बजावलेली नाही. मला गुन्हयातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर त्यामध्ये असे निष्पन्न झाले होते की आरोपीने फिर्यादीला हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन पिंपरणीच्या झाडाच्या मुळीने फिर्यादीच्या छातीवर मारहाण व दुखापत केली होती. मी आरोपीस ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास आरोपीतर्फे विधिज्ञ श्री एस.आर. गाढवे**

२. हे म्हणणे खरे आहे की, कुठल्याही प्रकरणात तपासकाम अथवा कोणतेही शासकीय काम करण्याकरिता लेखी आदेशाची आवश्यकता असते. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणात मला दोषारोपपत्र दाखल करण्याकामी कोणतेही लेखी आदेश देण्यात आले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणात मी कुठल्याही साक्षीदाराकडे वैयक्तीकरित्या चौकशी केली नवहती. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तुत प्रकरणात मी माइया सरतपासात सांगितलेल्या निष्कर्षांच्या अनुषंगाने फिर्यादीकडे कोणतेही तपासकाम केले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटनेबाबत मला वैयक्तीक कोणतेही माहिती नाही. हे

म्हणणे खरे नाही की, तरी सुध्दा मी आरोपी विरुध्द चुकीचे दोषारोपपत्र सादर केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास काहीही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्वीकृत,

RAVINDRA MADHUKARRAO BHENDE

Digitally signed by RAVINDRA MADHUKARRAO BHENDE
Date: 2025.09.16 13:30:20 +0530

दि.१६.०९.२०२५

(आर.एम. भेंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, वाई.